महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १२ वे दिनांक : ३१/१२/२०२५ वार : बुधवार

## नागपुरात महाविकास आघाडीत मोठी फूट : काँग्रेसने रात्री तीन वाजता युती तोडल्याचा राष्ट्रवादीचा आरोप

**नागपूर** : महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नागपुरात महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडले आहे. जागावाटपाच्या अनेक फेऱ्यांनंतर अखेरच्या क्षणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यातील युती तुटल्याचे स्पष्ट झाले आहे. माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांनी काँग्रेसवर जाणीवपूर्वक दगाबाजी केल्याचा गंभीर आरोप करत, आता आमचा पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून नागपुरात काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यात आघाडीबाबत चर्चा सुरू होती. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना प्रत्येकी १२ ते १५ जागा सोडण्याचे संकेत देण्यात आले होते. गेल्या निवडणुकीतील मतांची टक्केवारी आणि निवडून आलेले नगरसेवक या निकषांवर जागावाटप निश्चित झाल्याचा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला होता. मात्र, अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने अचानक माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

**'रात्री ३ वाजता एकतर्फी निर्णय' - अनिल देशमुख**

या घडामोडींवर संताप व्यक्त करताना अनिल देशमुख म्हणाले की, गेल्या चार-पाच दिवसांपासून सकारात्मक चर्चा सुरू होती. अगदी काल रात्रीपर्यंत जागांची यादी अंतिम झाली होती आणि दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या त्यावर स्वाक्षऱ्याही झाल्या होत्या. मात्र, काँग्रेसने रात्री ३ वाजता अचानक आणि एकतर्फी युती तोडल्याचा संदेश दिला. हे सर्व नियोजनबद्ध पद्धतीने आणि आम्हाला अडचणीत आणण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आले आहे.

**राष्ट्रवादीकडून 'एबी' फॉर्मचे वाटप**

काँग्रेसच्या या भूमिकेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आता आक्रमक झाली आहे. आघाडी तुटल्याचे स्पष्ट होताच पक्षाने आपल्या इच्छुक उमेदवारांना तातडीने 'एबी' फॉर्मचे वाटप करून स्वतंत्रपणे अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, या बिघाडीमुळे केवळ राष्ट्रवादीच नव्हे, तर शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काँग्रेसची शिवसेनेसोबतची युती अद्याप टिकून आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही.

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## अजित पवारांचे गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ



**मुंबई** : महाराष्ट्र कल्याणाची भाषा करणारे, त्यासाठीच काकाला सोडून भाजपसोबत गेल्याचा दावा करणारे अजित पवार यांनी पुण्यात चक्क कुख्यात गुंडांच्या टोळ्यांना राजकीय पाठबळ दिल्याचे समोर आले आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपत असताना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गजा मारणेंच्या पत्नीनंतर आता स्वतःचा नातू आयुष कोमकर याच्या हत्या प्रकरणात आणि कोट्यवधींच्या खंडणी प्रकरणात येरवडा कारागृहात असलेल्या सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांना उमेदवारी दिली आहे.

आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याच्या कुटुंबाला मिळालेल्या या राजकीय पाठबळामुळे पुण्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. बंडू आंदेकर कुटुंबाच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे या उमेदवारीबाबत अजित पवार गटाने सुरुवातीपासूनच कमालीची गुप्तता पाळली होती. अधिकृत घोषणा न करता थेट अर्ज भरण्यावर भर देण्यात आला. जेणेकरून विरोधाची धार कमी करता येईल. मात्र, आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणी आंदेकर यांच्या वकिलांनी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात धाव घेत 'एबी' फॉर्म सादर केले आणि ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. आंदेकरांच्या वतीने त्यांच्या वकिलांनीच ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

**कोर्टाची सशर्त परवानगी**

बंडू आंदेकर आणि त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांनी निवडणूक लढवण्यासाठी विशेष न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. "निवडणूक लढवणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे," असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्यांना अर्ज भरण्याची मुभा दिली. मात्र, न्यायालयाने काही कडक अटीही घातल्या आहेत.

**अजित पवारांच्या शब्दावर विश्वास ठेवायचा कसा?**

अजित पवार यांच्या पक्षाकडून आज सकाळी कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे हिला उमेदवारी देऊन चर्चेला उधाण आणले होते. आता त्यानंतर लगेचच बंडू आंदेकर कुटुंबाला उमेदवारी दिल्याने, अजित पवारांच्या 'गुन्हेगारीमुक्त पुणे' या घोषणेची खिल्ली उडवली जात आहे. 5 कोटी 40 लाखांच्या खंडणी प्रकरणात आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तींना सत्ताधारी पक्ष उमेदवारी कशी देऊ शकतो, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

गुंड बंडू आंदेकर आणि गुंड गज्या मारणे या दोघांचाही गुन्हेगारीचा तगडा इतिहास आहे. या दोघांची गुन्हेगारी प्रकरणे राज्यभर गाजली आहेत. असे असताना, सत्ताधारी पक्षाने अशा प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पाठबळ दिल्याने पुण्यातील राजकीय वर्तुळात आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३१ डिसेंबर २०२५


# गायराणवाडी येथील जि.प. शाळेत बिबटया मानव संघर्षावर प्रबोधन



**कन्नड (अरुण थोरात):** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गायरानवाडी ता. सिल्लोड येथे वन्यजीव-शासनाच्या मानव संघर्ष समितीचे सदस्य डॉ.संतोष पाटील, वनरक्षक साईनाथ पवार, श्री नरवडे यांनी शाळेतील विद्यार्थी तसेच परिसरातील पालक, नागरिक यांना बिबट्या पासून आपले स्वतःचे, आपले पाळीव प्राणी, परिसरातील लहान मुल, वयोवृद्ध माणसे, महिलांचे संरक्षण करण्यासाठीचे उपाय याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. त्यामुळे बिबट्याच्या सह जीवनास हे ग्रामस्थ यांचे मत अनुकूल बनले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संदिप मोरे, शिक्षिका श्रीमती जाधव, गणेश अण्णा हावळे, कैलास ढोरमारे, रामदास राऊत,अंकुश ढोरमारे, संतोष ढोरमारे, कृष्णा शिंदे, पंढरीनाथ पवार, रामेश्वर हावळे, गजानन ढोरमारे, राम राऊत, संदीप राऊत, किसन ढोरमारे, बाळू ढोरमारे, सोमीनाथ ढोरमारे, सतीश राऊत, गणेश शिंदे, सुभाष शिंदे, वामन शिंदे, बाळू पाटील शिंदे, पांडुरंग कांबळे यांच्यासह पालक ग्रामस्थ उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# डॉ.शिवचरण उज्जैनकर यांचं कार्य साहित्यिक व गुणवंतांना ऊर्जा देणारं : ख्यातनाम कवी, पत्रकार डी.बी. जगतपुरिया

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचा १६ वा वर्धापन दिन नुकताच माळी मंगल भवन,मुक्ताईनगर जिल्हा जळगाव या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. या सोहळ्याचे अध्यक्ष एरंडोल जिल्हा जळगाव येथील कवी लेखक प्रा.वा.ना. आंधळे तर उद्घाटक बाल भारतीचे निवृत्त सहसचिव तथा उज्जैनकर फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख खामगाव येथील श्री पांडुरंग दैवज्ञ व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यातील विविध जिल्ह्यातील ७५ मान्यवर पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र ,स्मृतीचिन्ह व गुलाब बुके देऊन तापी पूर्णा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच दुपारच्या तालुकास्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात मुक्ताईनगर तालुक्यातील ७५ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, गुलाब पुष्प आणि स्वामी विवेकानंदांचे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला या सोहळ्याचे अध्यक्ष शिक्षक नेते तथा जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पत पेढीचे माजी अध्यक्ष श्री एस.डी.भिरुड सर तथा या सत्राचे उद्घाटक म्हणून लाभलेले ख्यातनाम कवी, लेखक ,पत्रकार तथा उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य सल्लागार छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार तथा उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य सल्लागार डी.बी. जगतपुरिया उपाध्यक्ष खामगाव येथील विनोदभाऊ डिडवानिया फाउंडेशनचे राज्य नियोजन समितीचे अध्यक्ष अकोला येथील डॉ.अशोक शिरसाट फाउंडेशनचे राज्य सचिव छत्रपती संभाजी नगर येथील अॅड सर्जेराव साळवे विदर्भ विभागीय अध्यक्ष हिवरा आश्रम जिल्हा बुलढाणा येथील प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके सर राज्य सल्लागार अकोला येथील तुळशीराम बोबडे शिवलिंग काटेकर फाउंडेशनच्या अकोला जिल्हा कार्याध्यक्ष प्राथमिक डॉ.कल्पना गोरले बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार बुलढाणा जिल्हा समन्वयक खामगाव येथील बाळूभाऊ ईटणारे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष खामगाव येथील शंकरराव अनासुने खामगाव येथील प्रा.डॉ.दीपक नागरिक पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष पुणे येथील रामचंद्र गुरव पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव बार्शी जिल्हा सोलापूर येथील कवी अशोक मोहिते नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ.प्रशांत रणसूरे उत्तर महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष जळगाव येथील श्रीमती ज्योतीताई राणे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव मुक्तईनगर येथील गणेश कोळी आदी मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी ख्यातनाम कवी,पत्रकार छत्रपती संभाजीनगर येथील डी.बी. जगतपुरिया म्हणाले की, डॉ.शिवचरण उज्जैनकर हे चार भिंतीमध्ये अध्यापन करणारे शिक्षक नाही.




कवी श्रेष्ठ श्री.दि.इनामदार यांच्या काव्यप्रमाणे...सोन्यालाही सुगंध लाभे ज्ञानाला चांदणे माझी शाळा पहा बांधते विद्येला तोरणेतर डॉ.शिवचरण उज्जैनकर हे शाळेला विद्येचे तोरण बांधून शिक्षक व समाजसेवक , विद्यार्थी आणि गुणवंतांना अफाट ऊर्जा देणारे ध्येय धुंद अध्यापक आहेत. हा आजचा इयत्ता दहावी व बारावीच्या तालुकास्तरीय गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा त्याचेच मूर्तीमंत उदाहरण आहे मित्रहो, डॉ.उज्जैनकर हे राज्यस्तरीय आणि अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन आयोजित करून नवागतांना नवदितांना प्रेरणा देतात. ज्येष्ठांचा सन्मान करतात. त्यांच्या लेखणीतून साकारलेला ५१ व्यक्तींचा पंख पिसारा हा ग्रंथ कोण विसरेल, तापी पूर्णा राज्यस्तरीय पुरस्कारांचा हा सुगंध संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्र बाहेर दरवळत आहे. श्री शिवा सर यांचा पंख पिसारा माझ्या सत्व सार या समीक्षा पुस्तकात गौरवाने साकार झालेला आहे त्यांचे संघटन कौशल्य अफाट व अनुकरणीय आहे त्यांच्यासह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनापासून हार्दिक अभिनंदन करतो. श्री शिवा सरांचे संपूर्ण कुटुंबीय समाजसेवा करणारे आदर्श कुटुंब आहे त्यांच्या अर्धांगिनी सौ.संगीताताई या त्यांच्यामागे ठामपणे उभ्या आहेत शिवा सरांचे वडील श्री मधुकरराव व आई सौ.अनुसयाबाई यांचा त्यांना अखंड शुभाशीर्वादाचे मजबूत कवच लाभलेले आहे. तर मुलं सचिन, अरविंद आणि सौ.दिपाली हे सुद्धा त्यांना नेहमीच साथ देत असतात आज मूल्यांचा ऱ्हास होऊन ढासळलेल्या अवस्थेत प्रत्येक शाळेतून सांस्कृतिक कार्य व सामाजिक कार्य चेतावणाऱ्या उर्जावान श्री शिवा सरांची गरज आहे आणि संधी साधू साहित्यिकांना उज्जैनकर फाउंडेशन कडून गौरवण्यात येऊ नये असे सुद्धा मला वाटते असेही परखड मत श्री जगतपुरीया यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की,सूर्य उगवला उठा उठा रे प्रकाशा दे हा काआयुष्याच्या तेज पथावर पाय पुढे टाकादेशपथावर जाऊन एक एक पाऊल पुढे जात आहे. मी याचा २००८ पासूनचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे हा मोत्यासारखे माणसं टिकवणारा मातब्बर आहे. मी सन्मानित होणाऱ्या सर्व मुक्ताईनगर तालुक्यातील इयत्ता दहावी आणि बारावीतील असंख्य गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो आज उपस्थित असणाऱ्या गुणवंतांच्या गळ्यात यशाची माळ नेहमी पडत राहो हीच सदिच्छा व्यक्त करतो. या प्रसंगी कवी डी.बी. जगतपुरीया यांनी फाउंडेशनच्या कार्याविषयी गौरव उदगार काढले आणि उपस्थित सर्व पुरस्कारार्थी विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली. याप्रसंगी डॉ.शिवचरण उज्जैनकर यांचे वडील श्री मधुकरराव आई भाऊ अनुसयाबाई तसेच डॉ.उज्जैनकर व सौ.संगीता उज्जैनकर यांचा मान्यवरांनी शाल , स्मृतिचिन्ह, गुलाब बुके देऊन सत्कार केला हा भव्य सोहळा यशस्वीतेसाठी फाउंडेशनच्या कार्यकारणी खजिनदार सौ.संगीता उज्जैनकर फाउंडेशनचे कार्यकारिणी सचिव श्री प्रमोद पिवटे सदस्य प्रा. विनायक वाडेकर आजीव सभासद तथा उज्जैनकर यांचे जावई दीपक शेठ बुडूखले व कन्या सौ.दिपाली बुडूखले तथा डॉ.उज्जैनकर यांचे चिरंजीव अरविंद उज्जैनकर यांचे साड भाऊ मलकापूर येथील श्री सुनील मुंधोकार व सौ.लता मुंधोकार योगेश सोनार भावेश सोनार व उज्जैनकर सर यांचे कुटुंबीय आणि फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३१ डिसेंबर २०२५


## गडकिल्ल्यांवर पार्ट्या करणाऱ्यांवर कार्यवाही करा : सह्याद्री प्रतिष्ठान



**कन्नड (अरुण थोरात):** 31 डिसेंबर रोजी चाळीसगांव तालुक्यातील गड किल्यांवर मद्य पार्ट्या करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सह्याद्री प्रतिष्ठान चाळीसगांव यांनी केली आहे. याबाबत चाळीसगांव पोलीस स्टेशन यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान गेली अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवर संवर्धन कार्य, गडकिल्ल्यांचे पावित्र्य जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रातील तमाम गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेतील बलस्थाने असून अनेक मावळ्यांनी त्यासाठी आपले बलिदान दिले आहे. त्यावर अनेक समाध्या व देवी देवतांची मंदिरे आहेत. म्हणून हे गडकिल्ले पवित्र तीर्थस्थाने म्हणून मानते. आणि अशा या गडकिल्ल्यांवर दरवर्षी 31 डिसेंबर रोजी काही पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करणारे लोक दारू मटणाच्या पार्ट्यांचे आयोजन करून त्या ठिकाणी हिडिसपणा धिंगाणा घालण्याचे काम करीत असतात. यामुळे गड किल्ल्यांचे पावित्र्य भंग होते आणि गड प्रेमी शिवप्रेमी ही गोष्ट खपवून घेत नाहीत. त्यामुळे अनेक ठिकाणी वाद-विवाद होण्याची शक्यता असते. तेव्हा आपल्याकडे आम्ही या निवेदनाद्वारे मागणी करीत आहोत, की आपल्या चाळीसगाव तालुक्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या किल्ले राजदेहरे, किल्ले कन्हेरगड, किल्ले मल्हारगड, या ठिकाणी किल्ल्यांच्या पायथ्याला दि. 31 डिसेंबर रोजी पोलीस गस्त ठेवावी. तसेच या ठिकाणी दारू मटणाच्या पार्ट्या करताना कोणी आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. जेणे करून पुढील काळात अशा प्रकारचे उपद्रव कोणी करणार नाही. आपल्याला आवश्यकता वाटल्यास आपण सूचना केल्यास सह्याद्री प्रतिष्ठानचे सदस्य आपल्या मार्गदर्शनाखाली आपल्या मदतीस देखील हजर राहू शकतील. अशा आशयाचे निवेदन दि.30 डिसेंबर रोजी, चाळीसगाव सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राहुल राजपूत यांना देण्यात आले आहे. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष दिलीप घोरपडे, राज्यसदस्य सचिन पाटील, तालुका प्रमुख पप्पू पाटील, शहराध्यक्ष सचिन पैलवान पाटील, ललित अशोक चौधरी, नानाभाऊ चौधरी, सुरेश ठाकरे, मयूर भागवत, आदी सह्याद्री प्रतिष्ठानचे दुर्गसेवक उपस्थित होते.

## एआय तंत्रज्ञान विवेकाने आत्मसात करा : अच्युत गोडबोले

**पुणे :** ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ आणि लेखक अच्युत गोडबोले यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) तंत्रज्ञान विवेकाधिष्ठित वापराने आत्मसात करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. जीवनाच्या अनेक क्षेत्रांत एआय लवकरच जागा व्यापणार असून ते नाकारणे शक्य होणार नाही, असे ते म्हणाले. ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या (एआयबीओएमईएफ) नवव्या अखिल भारतीय अधिवेशनात ते मार्गदर्शन करत होते.

गोडबोले यांनी 'एआय'च्या युगाचा सुरुवातीपासून आढावा घेत, संगणकीय तंत्रज्ञानाचे विविध टप्पे स्पष्ट केले. 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कामगार वर्ग - संधी, आव्हाने आणि पुढील वाटचाल' या विषयावरील व्याख्यानात त्यांनी आपले विचार मांडले. हे अधिवेशन बीएमसीसी रस्त्यावरील दादासाहेब दरोडे सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला 'एआयबीओएमईएफ'चे महासचिव देवीदास तुळजापूरकर, अध्यक्ष स्वयंप्रकाश तिवारी, सचिव धनंजय कुलकर्णी आणि संयोजक शैलेश टिळेकर आदी उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग आपण रोखू शकत नाही किंवा नाकारू शकत नाही, ही वस्तुस्थिती असेल, तर या युगाचा विवेकाने स्वीकार करणे हाच चांगला मार्ग ठरेल, असे गोडबोले यांनी नमूद केले.

'एआय' युगाचा सर्वाधिक प्रभाव सेवा आणि आरोग्य क्षेत्रावर पडेल. अनेक प्रचलित रोगांवर नियंत्रण मिळवणे यामुळे सुलभ होईल. आर्टिफिशियल न्यूरॉन नेटवर्कने मशीनला डेटा पुरवून पॅटर्न ओळखण्याची क्षमता अधिकाधिक प्रगत करत नेणे, या प्रक्रियेत हे तंत्रज्ञान सध्या आहे. सर्व उद्योग, व्यवसाय, सेवा आणि सर्जनशीलतेची क्षेत्रेही कृत्रिम बुद्धिमत्तेने व्यापली जातील, असे चित्र त्यांनी मांडले.

'एआय'मुळे अनेक चांगल्या आणि सकारात्मक गोष्टी घडतील, ही वस्तुस्थिती असली तरी, हे तंत्रज्ञान अयोग्य आणि अनैतिक मार्गांनी वापरले गेल्यास त्याचे दुष्परिणामही संभवतात. त्यामुळे 'एआय'चा वापर नेहमीच विवेकाने आणि जबाबदारीने केला गेला पाहिजे, असे आवाहन अच्युत गोडबोले यांनी केले.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३१ डिसेंबर २०२५

प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

## चला आनंदाने देऊया

निरोप सरत्या वर्षाला
चला आनंदाने देऊया
मदत करूया निस्वार्थ
शपथ सर्वांनी घेऊया. १

झाले गेले विसरून
आज आनंदाने नाचूया
शपथ घेऊन संविधान
नवीन वर्षात वाचूया. २

संविधान वाचून आनंदाने
समजून घेऊ अधिकार
अन्याय होता कर्तव्याने
देऊ कायद्याने ललकार. ३

एकमेकांना मदत करून
विकास आपले साधूया
लोकशाहीच्या रक्षणासाठी
दिवस-रात्र सतर्क राहूया. ४

निरोप सरत्या वर्षाला
आज आनंदाने देऊ चला
वाचून गाऊन लिहून काव्य
विकसित करू शब्द कला. ५

दादा भाऊ तुम्ही सारे चला
सरत्या वर्षाला देऊ निरोप
सुखी समाधानाने राहतांना
सरत्या शेवटी नको आरोप. ६

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## सावलीसाठी

खूप लढाया हरलो
अन् होरपोळलो प्रत्येक वेळी
आयुष्याच्या रणरणत्या उन्हात
सावलीसाठी..

आता दिवस माथ्यावर येऊन
लागलाय मावळतीला
पण ऊन उतरणीचं
नाव घेत नाही
परिवर्तनाच्या नियम डावलून..
म्हणून झळा सोसतंय झाड
आज ही..पानगळ झाली तरी..

आता लढू म्हणतो
युद्ध शेवटचं..एखादं
साऱ्या अस्त्रशस्त्रांना पुन्हा पाजळून
जिंकण्यासाठी..

नाहीतर असं ही
लिहिलंच आहे भाळी ऊन
आयुष्याच्या वैशाख वणव्यात
राख होईपर्यंत..



**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

## नववर्ष २०२६ चे स्वागत आहे

जुने वर्ष सरतांना
नववर्ष २०२६ चे स्वागत आहे
नव्या जुन्या अनुभवाचे
गाठोडे बांधून दिल्याचे
२०२५ साक्षीदार आहे

कधी आनंदाने
कधी दु:खाने
कधी दूरचे लांब गेले
कधी लांबचे जवळ आले
नव्या जुन्या अनुभवाचे
गाठोडे बांधून दिल्याचे
२०२५ साक्षीदार झाले

तू तू... मी मी... होळी करत
२०२५ वर्ष आता सरले आहे
जुने वर्ष सरतांना
नववर्ष २०२६ चे स्वागत आहे

नव्या जुन्या अनुभवाचे
गाठोडे बांधून दिल्याचे
२०२५ साक्षीदार आहे

खंडीभर स्वप्न, नवीन दिशा
लग्न, प्रमोशन,
नव्या-जुन्या, आशा-आकांक्षा
पूर्णत्वाला नेण्यास
नववर्ष प्रमोशन घेऊन
२०२६ आला आहे
जुने वर्ष निरोप घेतांना
नववर्षाचे स्वागत आहे

इंग्रजी नववर्षाच्या ह्याच सदिच्छा
तुम्हा सर्वांना नववर्ष २०२६ च्या
भरभरून शुभेच्छा...

**लक्ष्मण वाल्डे -कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**

## संपतराव केरे यांना कन्नड तालुका साहित्य सेवा सन्मान पुरस्कार जाहीर



**कन्नड(अरुण थोरात):** त्रैमासिक तिफण,भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषद कन्नड यांच्या वतीने मागील सात वर्षापासून कन्नड तालुका साहित्य सेवा सन्मान पुरस्कार देण्यात येतो, यंदाचे पुरस्काराचे हे आठवे वर्ष असून हा पुरस्कार सेवानिवृत्त मुख्याध्यापक संपतराव सर्जेराव केरे यांना जाहीर झाला आहे दि. ११ जानेवारी २०२६ रोजी लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय येथे होणाऱ्या आठव्या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहेशिक्षक श्री केरे यांनी आपली व्यावसायिक सेवा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल जेऊर, कन्नड व अंभई येथे पूर्ण केली आहे.शिक्षक म्हणून आपली सेवा पूर्ण करत असतानाच त्यांनी आपला छंदही जोपासत विपुल असे काव्य लेखन कथालेखन नाट्यलेखन केले आहे. त्यांनी लिहिलेले 'संसक' नावाचे पुस्तक अतिशय प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्य सेवेचा सन्मान करताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे असे तिफण कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी सांगितले आहे.यांच्या या निवडीचे प्राचार्य विजयजी भोसले, ज्येष्ठ विधीज्ञ कृष्णा जाधव, परिषदेचे अध्यक्ष प्रवीण दाभाडे, सचिव अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, आदींनी अभिनंदन केले आहे.

## मनपा के. प्रा. व मा. विद्यालय मुकुंदवाडी शाळेत पोस्टर उपक्रम घेण्यात आला



**छत्रपती संभाजीनगर :** मा. जी श्रीकांत साहेब प्रशासक तथा निवडणूक अधिकारी मनपा छत्रपती संभाजीनगर. मनपा सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ जनजागृती उपक्रम मनपा के प्रा व मा विद्यालय मुकुंदवाडी शाळेत पोस्टर उपक्रम घेण्यात आला.केंद्रीय मुख्याध्यापकश्री चौधरी सर यांचा मार्गदर्शन लाभले आणि सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३१ डिसेंबर २०२५

# ध्यानातून व्यक्ती आणि समाजात जागतिक शांततेचा प्रवास

मानवजातीच्या इतिहासात शांततेचा शोध हा नेहमीच गहन, अविचलित आणि अत्यंत आवश्यक राहिला आहे. युद्ध, हिंसा, अन्याय, सामाजिक असमानता, धार्मिक व वांशिक द्वेष अशा अनेक संकटांनी भरलेल्या जगात “शांतता” हा शब्द केवळ आदर्श ठरला आहे; प्रत्यक्ष अनुभव मात्र अनेकदा दुर्मिळ ठरतो. आजचे जग वेगवान, तणावपूर्ण, स्पर्धात्मक आणि माहितीप्रधान आहे, जिथे व्यक्ती बाह्यदृष्ट्या प्रगत होत असली तरी अंतर्मनात असुरक्षित, कलहग्रस्त आणि मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. अशा परिस्थितीत, ३१ डिसेंबर रोजी साजरा होणारा ‘जागतिक शांतता ध्यान दिवस’ हा केवळ सांकेतिक दिवस नाही, तर तो व्यक्तीला आत्मपरीक्षण, अंतर्मुखता, मानसिक स्थैर्य आणि सामाजिक-सौहार्द साधण्याची अनन्यसाधारण संधी देणारा दिवस ठरतो.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शांतता ही केवळ युद्धाचा अभाव नसून, ती सामाजिक समरसता, विश्वास, सहकार्य, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांच्या जिवंत अनुभवाशी निगडित आहे. व्यक्तीच्या मनात द्वेष, भीती, असुरक्षितता आणि तणाव असल्यास सामाजिक संस्था, कुटुंबव्यवस्था आणि राजकीय रचना कितीही सक्षम असल्या तरी त्या अस्थिर राहतात. त्यामुळे शाश्वत शांततेचा पाया व्यक्तीच्या अंतर्मनात घातला पाहिजे. या संदर्भात ध्यानाचा सामाजिक दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा ठरतो, कारण ध्यान केवळ मानसिक स्थैर्य निर्माण करण्याचे साधन नाही, तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर, समाजातील संवादावर आणि सामाजिक संरचनेवरही दिसतो.ध्यान हे केवळ आध्यात्मिक साधन नसून मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्वास्थ्य साधण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. भारतीय परंपरेत ध्यान, योग आणि चिंतन यांना आत्मशुद्धी आणि समाजसुधारणेची साधने मानले गेले आहेत. महात्मा बुद्ध, महावीर, पतंजली तसेच संत परंपरेतील विचारवंतांनी ध्यानाच्या माध्यमातून अहिंसा, करुणा, समत्व, संयम आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक समाजशास्त्रातही ध्यानाकडे ‘मानसिक आरोग्य सुधारणा’, ‘तणाव व्यवस्थापन’ आणि ‘सामाजिक समरसता वृद्धिंगत करणे’ ह्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. ध्यानामुळे व्यक्ती स्वतःच्या भावनांशी जुळते, वर्तन नियंत्रित होते, निर्णयक्षमतेत सुधारणा होते आणि सहिष्णुता, करुणा व सामाजिक जाणीव वाढते.आजच्या समाजात तणावाचे स्वरूप बहुआयामी झाले आहे. बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, कौटुंबिक कलह, शैक्षणिक स्पर्धा, शहरीकरण, सामाजिक माध्यमांचा अतिरेक, राजकीय ध्रुवीकरण आणि पर्यावरणीय संकटे यामुळे व्यक्तीच्या मनावर सातत्याने ताण निर्माण होतो. या तणावाचे रूपांतर अनेकदा हिंसा, गुन्हेगारी, कौटुंबिक कलह, व्यसनाधीनता आणि सामाजिक असहिष्णुतेत होते. अशा परिस्थितीत ध्यान व्यक्तीला स्वतःशी जोडते, मन शांत करते आणि प्रतिक्रियात्मक वर्तनाऐवजी विवेकपूर्ण प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करते.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्ती आणि समाज यांच्यात गहन परस्पर संबंध आहे. व्यक्ती अस्वस्थ असेल तर समाज अस्वस्थ होतो; समाज अस्वस्थ असेल तर व्यक्ती अधिक अस्वस्थ बनतो. ध्यानाची प्रक्रिया या दुष्चक्राला तोड देते. जेव्हा व्यक्ती नियमित ध्यान करते, तेव्हा संयम, आत्मनियंत्रण, सहानुभूती आणि सामाजिक समरसतेची जाणीव जागृत होते. कौटुंबिक नातेसंबंध सुधारतात, कार्यस्थळी संघर्ष कमी होतात, शाळा-महाविद्यालयांत सहकार्य वाढते आणि समाजात विश्वास व सहिष्णुतेची भावना बळकट होते. अशा प्रकारे ध्यान ही वैयक्तिक साधना असली तरी तिचा परिणाम सामूहिक आणि सामाजिक स्वरूपाचा ठरतो.‘जागतिक शांतता ध्यान दिवस’ वर्षाच्या अखेरीस येतो, ही बाबही प्रतीकात्मक आहे. संपूर्ण वर्षभराच्या धावपळीचा, संघर्षाचा, यश-अयशाचा, वेदना-आशेचा लेखाजोखा घेण्याची ही संधी असते. समाज म्हणून आपण कुठे चुकलो, कुठे द्वेष वाढवला, कुठे संवाद तुटला, कुठे मानवी मूल्ये दुर्लक्षित केली, याचे चिंतन करण्याची वेळ आहे. ध्यानाच्या माध्यमातून ही आत्मपरीक्षणाची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण, सखोल आणि स्थिर होते.जागतिक पातळीवरही परिस्थिती संवेदनशील आहे. युद्धे, दहशतवाद, धार्मिक व वांशिक संघर्ष, विस्थापन, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय संकटे यांमुळे जग अस्थिर झाले आहे. आंतरराष्ट्रीय करार, कायदे आणि संस्था यांची भूमिका महत्त्वाची आहे; परंतु फक्त बाह्य उपाययोजना शाश्वत शांतता निर्माण करू शकत नाहीत. शाश्वत शांततेसाठी मानसिक स्थैर्य, नैतिक जाणीव, सहिष्णुता आणि करुणा आवश्यक आहेत. ध्यानाद्वारे व्यक्तीमध्ये ही मानसिक स्थैर्य आणि सहानुभूती निर्माण होते, जी सामाजिक बदलाला चालना देते.आज अनेक देशांमध्ये शाळा, रुग्णालये, कारागृह, लष्कर आणि कार्यालयांमध्ये ध्यानाचा उपयोग केला जातो. उद्दिष्ट फक्त कार्यक्षमता वाढविणे नसून मानसिक आरोग्य सुधारणा, सामाजिक समरसता व सहानुभूती वृद्धिंगत करणे हेदेखील आहे. समाजशास्त्रीय अभ्यास दर्शवितात की ध्यान करणाऱ्या व्यक्तींमध्ये आक्रमकता कमी, सहानुभूती अधिक, निर्णयक्षमतेत सुधारणा आणि सामाजिक नियमांचे पालन करण्याची प्रवृत्ती वाढते. त्यामुळे ध्यानाचे सामाजिक परिणाम व्यक्तिविशेषापेक्षा व्यापक असतात, आणि ते समाज सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.भारतीय समाजाच्या संदर्भात ध्यानाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विविधता, बहुसांस्कृतिकता, धर्म, भाषा, जातीय भिन्नता यांमुळे शांत सहअस्तित्व राखणे आव्हानात्मक आहे. अशा समाजात कायदे आवश्यक आहेत, परंतु अंतर्मनातून सहिष्णुता, समभाव आणि करुणा निर्माण करणाऱ्या साधनांची गरज आहे. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीच्या मनातून द्वेष, द्वंद्व आणि प्रतिस्पर्धात्मक भावना दूर करून ‘मी आणि तो’ या संकल्पनेला ‘आपण’ या व्यापक भावनेत रूपांतरित करते.‘जागतिक शांतता ध्यान दिवस’ हा दिवस फक्त ध्यान करणाऱ्यांचा दिवस नाही; तो समाजातील प्रत्येक घटकासाठी आत्मचिंतन, सुधारणा आणि सामाजिक जाणीव वाढविण्याचा दिवस आहे. शिक्षकांसाठी हा विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण देण्याचा दिवस आहे; पालकांसाठी मुलांशी संवाद सुधारण्याचा दिवस; राजकारण्यांसाठी सत्तेपेक्षा सेवा व संवादावर भर देण्याचा दिवस; सामान्य नागरिकांसाठी द्वेष, हिंसा आणि अफवा यांना नकार देऊन शांत संवाद स्वीकारण्याचा दिवस आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ध्यान ही एक ‘सॉफ्ट सोशल टेक्नॉलॉजी’ आहे. ती कोणावर लादता येत नाही; परंतु स्वीकारली गेली तर समाजात सकारात्मक बदल घडवू शकते. ध्यानामुळे निर्माण होणारी शांतता निष्क्रिय नसून सजग, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडवते. अशा नागरिकांकडूनच न्याय्य, समतावादी आणि शांततामय समाजाची उभारणी शक्य होते.आजच्या डिजिटल युगात, जिथे प्रतिक्रिया वेगवान आणि संवेदनांचा अभाव असतो, तिथे थांबून श्वासाकडे लक्ष देणे, मन शांत करणे आणि दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे ही क्रांतिकारी कृती ठरते. ‘जागतिक शांतता ध्यान दिवस’ आपल्याला ही शांत क्रांती साध्य करण्याची आठवण करून देतो, ज्यामुळे व्यक्तीपासून समाजापर्यंत सकारात्मक ऊर्जा पोहोचते आणि दीर्घकालीन सामाजिक सौहार्द व सामूहिक कल्याण घडते.शेवटी असे म्हणता येईल की शाश्वत जागतिक शांतता फक्त राष्ट्राध्यक्षांच्या बैठका, आंतरराष्ट्रीय करार किंवा कायद्यांमधून निर्माण होत नाही; ती प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनातून जन्माला येते. ध्यान ही प्रक्रिया अंतर्मनात शांततेचे बीज रोवते, संयम निर्माण करते आणि करुणाभाव जागृत करते. जर आपण डिसेंबर३१र हा दिवस द्वेष, तणाव आणि अस्वस्थतेचा शेवट करून शांतता, सहिष्णुता, करुणा आणि मानवी मूल्यांचा नव्या वर्षाचा आरंभ म्हणून साजरा केला, तरच जागतिक शांतता ध्यान दिवसाचा खरी अर्थपूर्ण साजरा होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com